लोकमत सिंधुदुर्ग, शुक्रवार, ३१ जानेवारी २०२०

मनोज रावराणे : लोरे नं. १ येथे स्वामी विवेकानंद ग्रंथालयाचे उद्‌घाटन

# वाचनाने कल्पनाशक्तीचा विकास होतो

लोकमत न्यूज नेटवर्क

फोंडाघाट : वाचन माणसाला विचाराने व कृतीने श्रीमंत करते. जगभरातील श्रीमंत व्यक्ती नियमितपणे वाचन करतात. आपणास उत्तम शरीरासाठी उत्तम व्यायाम व जेवणाची आवश्यकता असते त्याचप्रमाणे उत्तम बुद्धिमत्तेसाठी रोज वाचन करणे आवश्यक असते. वाचनाने कल्पनाशक्तीचा विकास होतो, असे प्रतिपादन कणकवली पंचायत समिती सदस्य मनोज रावराणे यांनी विद्यामंदिर हायस्कूल लोरे नं. १ येथे कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाट राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित स्वामी विवेकानंद ग्रंथालयाच्या उद्‌घाटनप्रसंगी केले.

यावेळी फोंडाघाट एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी मनीष गांधी, फोंडाघाट महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कामत, लोरे नं. १ सरपंच अजय रावराणे, उपसरपंच अनंत रावराणे, उद्योजक जीवन रावराणे, राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख प्रा. डॉ. बालाजी सुरवसे, प्रा. संतोष आखाडे व मुख्याध्यापक देसाई उपस्थित होते. रावराणे यांनी फोंडाघाट महाविद्यालयाच्या एनएसएस विभागाचे अभिनंदन करीत ५००० रुपये किमतीची पुस्तके स्वामी विवेकानंद ग्रंथालयासाठी देणगी स्वरुपात दिली.



लोरे नं. १ येथील कार्यक्रमात मनोज रावराणे यांनी मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कामत म्हणाले, पुस्तक मस्तक घडवत असते. घडलेल्या मस्तकासमोर अनेकजण नतमस्तक होत असतात. विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा. वाचाल तरच जीवनात खऱ्या अर्थाने वाचाल असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला. ग्रंथालयाचे उद्‌घाटक व फोंडाघाट एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी मनिष गांधी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त पुस्तकांचे वाचन करणे आवश्यक आहे. वाचनाने आपल्या जीवनात निश्चित परिवर्तन घडू शकते. स्वामी विवेकानंद ग्रंथालयात विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थांनी मिळून जास्तीत जास्त ग्रंथ जमा करुन ते जास्तीत जास्त वाचकांना उपलब्ध करून द्यावेत, असे आवाहन त्यांनी केले.

मनोज रावराणे यांचा मनिष गांधी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन एनएसएस विभाग प्रमुख प्रा. डॉ. बालाजी सुरवसे यांनी तर आभार प्रा. संतोष आखाडे यांनी मानले. यावेळी स्वयंसेवक गणेश पवार, काशिनाथ जाधव, प्राची राणे, काजल सुतार, सूरज लाड, रोहित जाधव तसेच विद्यामंदिर हायस्कूल लोरे - वाघेरी येथील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.